(Gomantak Regional)

Date : 10-Apr-08
Headline ; Arthaeon starts Artha Money Service
Event : Press conference to announce the launch of Arthaeon Financial Services
Location : Mumbai

# ‘अर्थइऑन’तर्फे अर्थमनी सेवा सुरू

## अर्थजगतः देशातील पहिलें मनी सुपरमार्केट ठरणार

मुंबई, ता. ९: अर्थइनॉन फायनान्शिअल सर्व्हिसेस कंपनीने भारतात किरकोळ वित्तीय सेवा क्षेत्रात अर्थमनी नावाची एक आगळीवेगळी सेवा सुरू केली आहे. ही सेवा म्हणजे विविध वित्तीय उत्पादने एकाच ठिकाणी मिळणारे एक मनी सुपरमार्केटच ठरणार आहे. प्रत्येक भारतीय ग्राहकांस मग तो निवासी असो वा अनिवासी ही सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. अर्थमनी सेवा कंपनीच्या सर्व शाखा, वितरण शृंखला; इंटरनेट व टेलिफोन माध्यमाद्वारे उपलब्ध करण्यात आली आहे.

एकाच -छताखाली सर्वप्रकारची वित्तीय उत्पादने उपलब्ध झाल्यामुळे ग्राहकांना विविध उत्पादनांचा तुलनात्मक अभ्यास करून सुयोग्य उत्पादन निवडण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होणार आहे. वैयक्तिक वित्तीय उत्पादनाबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी अर्थमनीतर्फे प्रशिक्षित व्यवस्थापकांचीही नेमणूक करण्यात येणार आहे. अशा प्रकारची एकछत्री सेवा देणारी अर्थइऑन ही पहिलीच भारतीय कंपनी आहे.

गेल्या तीन वर्षांपासून भारत ९ टक्के दराने विकास साध्य करीत असल्यामुळे वित्तीय सेवांना देशात अभूतपूर्व मागणी आली आहे. या मागणीपैकी काही भाग बँका, ॲसेट मॅनेजमेंट कंपन्या व इन्शुरन्स कंपन्यांतर्फे पूर्ण केला जात आहे. पण प्रत्येक कंपनी एकट्या एकट्याने सेवा पुरवत आहे. अर्थमनी सेवा मात्र सर्वव्यापक सेवा देण्यास सज्ज आहे. अर्थइऑन वित्तीय सेवा कंपनीचे सीइओ-व्यवस्थापकीय संचालक सुरेश रंगराजन म्हणाले, “भारतात सुबत्ता आल्यामुळे किरकोळ ग्राहकांच्या खिशात अभूतपूर्व पैसा आला आहे. त्यामुळे पैसा व्यवस्थापन व वैयक्तिक गुंतवणुकीबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज उत्पन्न झाली आहे आणि अर्थमनीच्या माध्यमातून हीच गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.”

चालू वर्षात कंपनी देशभरात ५० शाखा सुरू करणार आहे.